**समरी फौ. खटला.नं.२३५/२०२२**
**नि.३७ लगत**

**फिर्यादी तर्फे साक्षीदार क्र.१ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| **माझे नाव** | **:-** | **नंदकुमार नामदेव फाळके** |
| **वय** | **:-** | **६५ वर्षे** |
| **व्यवसाय** | **:-** | **शेती** |
| **पत्ता** | **:-** | **१११, केसरकर पेठ, जि.सातारा.** |

**सरतपास फिर्यादीतर्फे ॲड. श्री. जे.एस. गायकवाड यांचेमार्फत शपथेवर सुरु -**

१५. आता मला निशाणी ३९/1 लगतचा धनादेश दाखवण्यात आला. तो आरोपीने मला दिलेला आहे. सदरचा धनादेश दिनांक २५.०१.२०२२ रोजीचा रक्कम रुपये ५ लाख किंमतीचा बँक ऑफ महाराष्ट्र शाखा सातारा या बँकेचा आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर आरोपीची सही आहे. ती मी ओळखतो. त्यास **निशाणी ४०** देण्यात येते.

१६. आता मला निशाणी ३९/२ लगतचा रिटर्न मेमो दाखवण्यात आला. सदरचा रिटर्न मेमो बँक ऑफ महाराष्ट्र चा दिनांक ०३.०२.२०२२ रोजीचा आहे. त्यावर बँक अधिका-यांची सही व शिक्का आहे. त्यास **निशाणी ४१** देण्यात येते.

१७. धनादेश न वटता परत आल्याने दिनांक २४.०२.२०२२ रोजी मी वकीलांतर्फे आरोपीला रजिष्टर पोष्टाने नोटीस पाठवली. आता मला सदर नोटीसची स्थळप्रत दाखवण्यात आली. त्यावर माझी व माझ्या विधीज्ञांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ४२** देण्यात येते.

१८. सदरची नोटीस आरोपीला मिळाल्याची पोष्टाची पोहोच पावती आहे. त्यावर आरोपीची सही आहे. ती मी ओळखतो. त्यास **निशाणी ४३** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण**

**उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. एस.आर. गाढवे यांचे मार्फत शपथेवर सुरु-**

१९. किरण नंदकुमार फाळके हा माझा मुलगा आहे. मी, माझी पत्नी शोभा व मुलगा

किरण एकत्रात राहण्यास आहे हे म्हणणे खरे आहे. माझा सातारा १११ केसरकर पेठ येथे शुभप्रेस वर्क नावाचा फाईलपट्टी व कॅलेंडर पट्टी बनविण्याचा व्यवसाय होता हे म्हणणे खरे आहे. सदर ठिकाणी आरोपीचा पती प्रविण भांदिर्गेचा मशिनरी बनवुन विक्री करण्याचा व्यवसाय होता हे म्हणणे खरे नाही.

२०. मी सन २०१४ मध्ये आरोपीच्या पतीकडुन माझ्या व्यवसायासाठी मशिनरी खरेदी केलेली होती हे म्हणणे खरे नाही. सदर मशिनरी खरेदी करण्यासाठी माझ्याकडे पैसे नव्हते हे म्हणणे खरे नाही. आरोपीच्या पतीकडुन मशिनरी खरेदी करण्यासाठी मी सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा सातारा यांचेकडुन कर्ज घेतले होते हे म्हणणे खरे नाही. आरोपीच्या पतीकडुन खरेदी केलेल्या मशिनरी पोटी मी त्याला कोणतेही देणी लागत नाही हे म्हणणे खरे नाही. सदर कर्ज १८ लाख १४ हजार मशिनरी खरेदीच्या पोटी आरोपीच्या पतीच्या खात्यावर जमा केले हे म्हणणे खरे नाही.

२१. माझे व आरोपीचे कौटुंबिक संबंध चांगले होते. आरोपीच्या कुटुंबियांशी माझे पूर्वी चांगले संबंध होते. त्यामुळे मला आरोपी व तिच्या कुटुंबियांची चांगली माहीती होती. आम्ही शेजारी राहण्यास आहे. आरोपीची सासु, सासरे यांना मी चांगला ओळखतो. आरोपीच्या वडीलांना मी ओळखत नाही. आरोपीचे सासरे तहसिलदार म्हणुन नोकरीस होते हे म्हणणे खरे आहे. सध्या ते निवृत्त असुन त्यांना पेंशन मिळते.

२२. आरोपीच्या पतीचा श्री मशिनरी नावाचा व्यवसाय आहे हे म्हणणे खरे नाही. माझ्या प्रतिज्ञापत्रातील मजकुर आरोपीच्या पतीचा श्री मशिनरी नावाचा व्यवसाय असल्याबाबतचा मजकुर मला माहीत नाही.

२३. आरोपी गुरुकुल शाळेत लिपिक म्हणुन कार्यरत आहे हे म्हणणे खरे आहे. आरोपीची कौटुंबिक परिस्थीती चांगली आहे हे म्हणणे खरे नाही. आरोपी व आरोपीचे पती यांच्या नावावर कोणतेही कर्ज नाही हे म्हणणे खरे नाही.

२४. केसरकर पेठ सर्व्हे नं.१११ ही जागा माझ्या मुलाच्या मालकीची आहे हे म्हणणे खरे आहे. सदर ठिकाणी माझा व आरोपीच्या पतीचा व्यवसाय व्यवस्थीत चालत होता हे

म्हणणे खरे नाही. आरोपीच्या मालकीचा कोणताही व्यवसाय नाही हे म्हणणे खरे आहे. दिनांक ०९.०६.२०१८ रोजी माझ्यात व आरोपीच्यात कोणताही करारनामा झाला नाही हे म्हणणे खरे नाही. माझा व आरोपीचा व्यवसाय शेजारी शेजारी असल्याने आरोपीला जास्त फायदा होत असल्याने मी आरोपीकडे माझे कर्ज भागविण्यासाठी पैशाची मागणी केली हे म्हणणे खरे नाही. त्यावेळी आरोपीकडे देण्यासाठी पैसे नसल्याने आरोपीने मला १८६१७८ ते १८६१८३ असे एकुण ६ धनादेश लिहुन दिले हे म्हणणे खरे आहे.

२५. आरोपीकडुन मी सदरचे ६ धनादेश जबरदस्तीने घेतले हे म्हणणे खरे नाही. ६ धनादेशापैकी एका धनादेशाबाबत सातारा न्यायालयात समरी फौजदारी खटला क्र.१९६४/२०१९ दाखल केली होती हे म्हणणे खरे आहे. माझा मुलगा किरण याने ६ धनादेशापैकी एका धनादेशाबाबत सातारा न्यायालयात समरी फौजदारी खटला क्र.२१९१/२०१९ दाखल केली होती हे म्हणणे खरे आहे. त्या दोन्ही धनादेशांचे आरोपी मला कोणतेही देणे लागत नाही हे म्हणणे खरे नाही.

२६. माझ्या मागणीप्रमाणे आरोपीने मला पैसे दिले नाहीत म्हणुन मी आरोपीकडुन घेतलेला धनादेश क्र.१८६१७९ दिनांक २५.०१.२०२२ रोजी भरला हे म्हणणे खरे आहे. आता मला निशाणी ४० वरील धनादेश दाखवण्यात आला. त्यातील रक्कम रुपये ५ लाख मराठीमध्ये लिहले असुन दिनांक २५.०१.२०२२ ही इंग्रजीमध्ये लिहले आहे हे म्हणणे खरे आहे. सदर धनादेशावरील सही आरोपीची नाही हे म्हणणे खरे नाही.

२७. आरोपी व माझ्यात कोणताही देणे घेण्याचा व्यवहार झाला नव्हता हे म्हणणे खरे नाही. त्या संदर्भात कोणताही कागदोपत्री पुरावा मी अभिलेखावर दाखल केलेला नाही. आरोपी व माझ्यात कोणताही देणे घेण्याचा व्यवहार झाला नसल्याने मी कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही हे म्हणणे खरे नाही.

२८. मी आरोपीकडुन घेतलेल्या ६ धनादेशांचा गैरवापर करु नये यासाठी आरोपीने मला दिनांक १८.०४.२०१९ रोजी विधीज्ञांमार्फत नोटीस पाठवली होती हे म्हणणे खरे नाही. सदरची नोटीस मला दिनांक २२.०४.२०१९ रोजी मिळाली हे म्हणणे खरे नाही. दिनांक

१८.०४.२०१९ रोजीच्या नोटीसीचा राग मनात धरुन मी व माझा मुलगा दिनांक २०.०५.२०१९ रोजी आरोपीच्या घरी गेला हे म्हणणे खरे नाही. आरोपीच्या घरी आमच्यात वाद झाले हे म्हणणे खरे नाही.

२९. दिनांक २२.०५.२०१९ रोजी आरोपीने माझ्या विरुद्ध पोलिस स्टेशनला तक्रार दिली हे म्हणणे खरे आहे. सदर तक्रारीवरुन सातारा न्यायालयात नियमीत फौजदारी खटला क्र.५५५/२०१९ दाखल केला हे म्हणणे खरे नाही.
प्रश्न - दिनांक २५.०१.२०२२ रोजी आरोपीने मला कोणताही धनादेश दिला नाही ?
उत्तर - आरोपीने मला माझ्याकडील असलेले चेक भरा असे सांगितले.

३०. आरोपीने कोणताही धनादेश दिलेला नाही हे म्हणणे खरे नाही. आरोपीने पूर्वी दिलेल्या धनादेशावर तारीख टाकुन मी आरोपीच्या संमतीशिवाय सदर धनादेश भरला हे म्हणणे खरे नाही. माझ्या नोटीसला आरोपीने दिनांक ०९.०३.२०२२ रोजी उत्तर दिले हे म्हणणे खरे आहे. सदर नोटीस उत्तराचा उल्लेख माझ्या फिर्यादमध्ये किंवा सरतपासात केलेला नाही हे म्हणणे खरे आहे.

३१. धनादेश क्र.१८६१७९ चा उल्लेख मला दिलेल्या नोटीसीत, फौजदारी खटल्यात व पोलिस स्टेशला दिलेल्या तक्रारीत नमुद केलेला आहे हे म्हणणे खरे नाही. माझ्या फिर्यादमध्ये व प्रतिज्ञापत्रातील नमुद मजकुर धनादेश क्र.१८६१७९ मला दिनांक २५.०१.२०२२ रोजी दिला असे खोटे नमुद केले हे म्हणणे खरे नाही. आरोपी मला कोणतेही कायदेशीर देणे लागत नाही हे म्हणणे खरे नाही. आरोपीकडुन घेतलेले धनादेश क्र. १८६१८१ ते १८६१८३ माझ्या ताब्यात आहेत हे म्हणणे खरे आहे. सदर धनादेशांवर कोणत्याही तारखा नमुद नाहीत हे म्हणणे खरे आहे.

३२. आरोपीकडुन घेतलेले धनादेश मी मुंबईत भरेन असे तिला मी धमकी देतो हे म्हणणे खरे नाही. माझ्या नावावर सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेत कर्ज आहे हे म्हणणे खरे आहे. मी माझ्या गावातील पाडळी विकास सोसायटी यांच्याकडुन मी कर्ज घेतले आहे हे म्हणणे खरे आहे. माझ्या व्यवसायासाठी मी सोने तारण कर्ज घेतले आहे हे म्हणणे खरे आहे.

दिनांक २१.०५.२०२२ रोजी माझ्या कडे ५ लाख शिल्लक असल्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला किंवा कसे याबाबत मी सांगु शकत नाही. आरोपी व तिच्या पतीला त्रास देण्यासाठी मला दिलेल्या धनादेशाचा गैरवापर करुन खोटी केस दाखल केली आहे हे म्हणणे खरे नाही.

३३. माझ्या प्रतिज्ञापत्रातील नमुद मजकुर आरोपीच्या पतीला त्याच्या व्यवसायात तोटा झाला हा चुकीचा नमुद केला आहे हे म्हणणे खरे नाही. माझ्या प्रतिज्ञापत्रातील नमुद मजकुर दिनांक २५.०१.२०२२ रोजी धनादेश दिल्याबाबत चुकीचे नमुद केला आहे हे म्हणणे खरे नाही. धनादेश वटण्याची आरोपीने हमी दिली हे मी चुकीचे नमुद केले हे म्हणणे खरे नाही. माझ्या प्रतिज्ञापत्रातील पॅरा क्र.६ मधील नमुद मजकुर दिनांक ०४.२.२०२२ रोजी आरोपीचे वरील बँकेने ...... केला आहे नमुद केला आहे. दिनांक ०४.०२.२०२२ रोजी कोणताही धनादेश अनादरीत झाला नाही हे म्हणणे खरे नाही. माझ्या प्रतिज्ञापत्रातील व सरतपासातील मजकुर खोटा सांगितला आहे हे म्हणणे खरे नाही. आरोपीला त्रास देण्यासाठी व पैसे उकळण्यासाठी मी खोटी केस केली आहे हे म्हणणे खरे नाही. मी आज खोटी साक्ष देत आहे हे म्हणणे खरे नाही.

**उलटतपास पुर्ण**

**समक्ष/ श्रवणोत्तर स्वीकृत**

SMRUTI SAGAR PALSULE

Digitally signed by SMRUTI SAGAR PALSULE
Date: 2025.03.01 16:21:35 +0530

**(एस.एस.पळसुले)**

**दिनांक :- ०१.०३.२०२५** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वाई.**